

स्वर तालाचा जल्लोष

लागा चुनरी मे दाग छुपाऊँ कैसे
चुनरी में दाग छुपाऊँ कैसे, घर जाऊँ कैसे ? ॥ धृ ॥
हो गई मैली मोरी चुनरियाँ
कोरे बदन सी तोरी चुनरियाँ
हा ऽऽ जा के बाबुल से नजरे मिलाऊँ कैसे
घर जाऊँ कैसे ॥ १ ॥
भूल गई सब बचन बिदा के
खो गई मै ससुराल मे आके
हा ऽऽ जा के बाबुल से नजरे ॥ २ ॥
कोरी चुनरिया आत्मा मोरी
मैल है मायाजाल
वो दुनिया मोरे बाबुल का घर
ये दुनिया ससुराल
हा ऽऽ जा के बाबुल से नजरे ॥ ३ ॥

राज कपूर आणि दिलीप कुमार यांच्यात १९५० च्या आधीपासून एक तीव्र स्पर्धा होती. कोण श्रेष्ठ हे ठरवण्यासाठी त्या दोघांच्या चाहत्यांमध्ये प्रचंड वादविवाद होत असणार ! १९६० मधे 'कोहीनूर' चित्रपटात दिलीपकुमारने महमंद रफीच्या बुलंद स्वरात 'मधुबन में राधिका नाचे रे' हे शास्त्रीय ढंगातलं गीत रुपयेरी पडद्यावर विलक्षण आत्मीयतेने सादर केलं.

मग १९६३ मधे रोशनच्या अप्रतीम धूनने सजलेलं मन्नाडेच्या सुरेल स्वरातलं 'लागा चुनरी में दाग' हे मस्तीभरं गीत, राजकपूरने 'दिल ही तो है' या चित्रपटात पेश केलं. ! त्याच्या फॅन्सना अत्यानंद झाला यात नवल नव्हतं.

दाढी मिशा, काळी शेरवानी, चष्मा या वेषांतरीत अवतारातही राज कपूरने 'लागा चुनरी मे दाग' ला यथोचित न्याय दिलाय. रोशनची धून तर लाजबाबत आहेच पण विशेषत: शेवटी येणारा 'ना दिम् तनन दिर दिर तानाम तान देरे' हा फास्ट लयीतला तराणा, मन्ना डे ने जोरकसपणे पेश करत बहार आणलीय.

साहीरचे शब्द इथे उदात्त अध्यात्माची डूब घेऊन आलेत. पाप-पुण्य, जन्नत-जहाँ, स्वर्ग नरक या कल्पना सर्वच धर्मात आहेत. या गाण्यात ते सासर-माहेरमधला रुपकात्मक भेद दाखवत शब्द-सुरांची उंची वाढवून गेलेत. छोट्या शब्दात मोठा आशय व्यक्त करण्याची कुवत फार थोड्या कवींमधे असते. म्हणून तर साहीरचं अप्रुप अमृता प्रितमसारख्या विख्यात लेखिकेला वाटलं असणार !

'लागा चुनरी मे दाग' मधली पापभिरु वृत्ती ही त्या जुन्या जमान्याची निशाणी. 'भगवान को मुँह दिखाना है' वगैरे शब्द आज हास्यास्पद वाटतील. पण तेव्हा माणसं साधी, सज्जन होती. अब्रुला जपत माणसं जगायची.

'लागा चुनरी में दाग' या गाण्याचं आणखी एक वेगळेपण म्हणजे हे गाणं 'स्टेज शो' मध्ये अनेक गायकांनी समरसून गायलंय. सचिन पिळगावकर पासून बालसुब्रह्मण्यम्पर्यंत आणि सुदेश भोसले पासून सोनू निगमपर्यंत अनेकांनी मन्ना डेचं हे गाणं सही सही गायलंय.

बेंगलोरच्या एका 'स्टेज शो'मधे मन्ना डेच्या उपस्थितीतच चंद्रशेखर गाडगीळला हे गाणं म्हणायची फर्माईश झाली. 'ये मेरा गाना है भाई, मुझे गाने दो' या मन्ना डेच्या विनंतीला पब्लिकने अव्हेरुन चंद्रशेखर गाडगीळकडूनच हे गाणं म्हणवून घेतलं. इथे मन्ना डेची कीव करायची का चंद्रशेखरचं कौतुक करायचं ? 'मधुबन मे राधिका' गाणाऱ्या महमंद रफीवर अशीवेळ आली नसणार हे उघड आहे.

- सदानंद गोखले